# १०

# धाडशी शिवाजी

अर्थात्

## शाहिस्ताखानाचा पराभव.

## पोवाडा.

नाश कराया शिवरायाचा आला शाहिस्ताखान ॥ छाटुन बोटें दूर पळविला; । धन्य शिवाजी भूरमण ! ॥ ध्रु० ॥

—: १ :—

केला धुमाकुळ शिवरायानं संकट मोंगलराज्याला । स्वातंत्र्याच्या मुळ्या भेदिती अभेद्य मोंगल-भिंतीला ! ॥ चिरे

घडाघड पडूं लागले, बुरुज कोसळे धरणीला ! । शिवशक्तिच्या तोफेमधुनी सुटला भीषणसा गोळा ! ।। शिवतेजाची वीज देतसे झटके औरंगजेबाला ! । कांहीं सुचेना, अन्न रुचेना, झोंपहि ये ना नयनाला ! ।। भगवा झेंडा फडफड फडके भूषण वाऱ्याला झाला । फडफड करुनी गगनी बोले, ' धन्य शिवाजी अवतरला !'।। दऱ्याखोऱ्यांतुन मैदानांतुन पाउल टाकी शिव जेव्हां । विजय-श्रीचीं फुलें उमलतीं त्या त्या स्थानीं मग तेव्हां ।। फिरंग फिरवी शिवबा इकडे, तिकडे मोंगल गडबडला ! । टाप घोडिची ऐकुनि तिकडे शाहा कासाविस झाला ! ! ।। दर्प असा हा शिवशक्तीचा सहन होइना दिल्लीला । रात्रंदिन नच झोंप कुणाला, काय करावें शिवबाला ! ।। विचार ठरला, दूत निघाला आला दख्खन देशाला । बादशाहाचं पत्र दिलं मग त्यानं शाहिस्ता-खानाला ! ।। " चला, मरा, तुम्हि कांहिं करा, पण धराच या शिवचोराला । सरा न मागे, घरा न जावें, चराचरा शिवचोर चिरा ! " ।। बादशाहाचं पत्र असं हें वाचुन शास्ताखान जरा। मनीं चरकला, विषण्ण झाला, क्षणिं कोमेजुन ही गेला ! ।। शुभ्र लोंबत्या दाढीवरचा रंग लगोलग पालटला ! । हात मस्तका-वरती ठेवुन करि तो घोर विचाराला ।। " काम असें हें अवघड मोठें शिवा न सोपा धरण्याला । पिशाच्च चेटुक अनुकुल त्याला कसें धरूं सैतानाला ! ! " ।। स्वारीचा पण निश्चय केला





शूर शिपाई जमवीला । फौज घेउनी खान चालला शिवरायाला धरण्याला ।। जातां जातां बेत ठरवला चाकण किल्ला घेण्याला। वेढा दिधला मग खानानं सत्वर, चाकणकिल्लयाला ।। प्रकार पुढचा काय जाहला सांगिन पुढच्या चौकाला । धन्य शिवाजी रसिकजनानों ! ऐका श्रीशिवकीर्तीला ।। १ ।।

—: २ :—

**नरसाळा** फिरंगोजी वर । होता किल्लेदार । मोठा बाणेदार । झाला तय्यार संग्रामाला । केलं घनघोर लढाईला । अस्मानांत धुरळा सारा भरला ! ।। आटोकाट झगडा त्यानं केला । किल्ला लढविला । उपाय पर थकला। खानानं केलं कैद त्याला । किल्ला खानाच्या हातीं गेला । नरसाळा धन्य धन्य झाला ! ।। चाल ।। शाहिस्ताखान मग त्याला । काय बोलला सांगतों तुम्हांला । " व्हा आतां आमच्या चाकरीला । चढवीन मोठ्या हुद्याला । शिवा काय देणार तुला ? । शिवाजीचा नाश-करण्याला खान हा आला ।। शिवाजीचा नाश खास झाला । असं समज आज या वेळा ।। कोल्ह्यांनं सिंहाशीं झगडा कधीं काय केला ? ।। शिवा चोर बंडखोर झाला । चल माझ्यासंगं या वेळा । पकडुया बंडखोराला " ! ! । असं बोलला खान हो

त्याला। फिरंगोजी लालेलाल झाला !। फिरंगोजी बोलला खानाला ।। चाल ।। "शिवाजीचा बंदा नोकर। नरसाळा अस्सा राहणार! ।। शिवाजीच्या पायावर शीर । ठेविन मी, तोच मज प्यार।। शिवराय माझा रे मोर। शिवराय चंद्राची कोर ।। चाल ।। बडबडसी व्यर्थ या वेळा। जंवा पाहशी खाना! तूं त्याला। तंवा दरदरेल घाम अंगाला। दांतखिळी बसेल तोंडाला। शिवराय सिंह रे झाला। लोळवले कैक भूमिला। करु नको त्याच्या निंदेला। जारूं नको त्याच्या वाटेला। माझ्यासारखे कैक रे वीर त्याच्या पदरीला ।। परतून जा जा माघारा। अन् सांग बादशाहाला। कीं शिवाजीला कैद करण्याला। गेलों होतों—आलों माघारा!। जो करील कैद शिवाजीला। असा एवढा साऱ्या दुनियेंत कोण हि न झाला !।" ।। चाल ।। ऐकुनी बोल वीराचे। खान मनीं गारेगार झाला !।। पाहून स्वामिभक्तीला। खानाला संतोष झाला! ।। खानानं सोडलं मग त्याला। अन् त्याचा मोठा गौरव केला ।। चाल ।। शिवरायाकडं पाठवलं त्यानं मग त्याला ।। चाल ।। चाकणचा किल्ला घेऊन। चालला जल्दीनं। मोठ्या ऐटीनं। पुण्यामंदि थेट खान आला। शिवाजिचा वाडा त्यानं घेतला। ऐका प्रकार काय झाला ।। २ ।।





—: ३ :—

**शिवाजिच्या** महालामधिं खान। राहिला येऊन। बंदोबस्तानं। जागजागीं ठेवलं शिपायाला। हुकुम मनाईचा हत्याराला। वेशीवर पहारा रोज बसला! ।। खानाच्या परवान्यावीण। फिरकेना कोण। पाखरुं हि लहान। एवढा त्यानं बंदोबस्त केला। धाक शिवाजीचा वाटे त्याला। रात्रींही झोंप न डोळ्याला! ।। सिंहाच्या गुहेमधिं जसा। ससा कसाबसा। शिरावा तसा। शिरला पुण्यामंदि खान ते वेळा। मगराच्या दाढेला हात। हात लावला त्यानं निभ्रांत। निभ्रांत जाहला भ्रांत। झाला काय वात। कळेना मजला! ।। शिवराय होता सिंहगडीं। घेउन संवगडी। विचार घडोघडी। घडविती किल्यावरती ते वेळा ।। शाहिस्ता आला चालून। पुण्यामंदि राहिला येऊन। काढावा कसा हुसकून। विचार जोरानं असला हा झाला ।। पाठवला एक ब्राह्मण। शिवरायानं। पुण्यामंदि त्यानं। जाऊन वश केलं एका मराठ्याला ।। एक खोटचा लग्नाचा घाट। घाट घातला बीनबोभाट। वरातीचा रात्रीला थाट। केला ऐटींत। लोक किति जमला! ।। चाल ।। घाट कात्रजचा जवळ झाला। तीन कोसाच्या अंतराला। शक्कल सुचली शिवाजीला। खानाची फौज चकविण्याला। पोत बांधवले हो झुडपाला!। कात्रज

घाटांत ते वेळा । पोत बैलांच्या हो शिंगाला ! । बांधले खानाला ठकविण्याला । झुडपं झालीं साहाय्य शिवाजीला । पशुपक्षी झाले साहाय्य त्याला । दुसरा जणु रामचंद्र आला ! । नंदी झाले साहाय्य शंकराला ! । गाऊं किती त्याच्या पोवाड्याला ? । इकडं असा त्यानं बेत केला । अन् एका बोलावलं मावळ्याला । गवताचा भारा दिला त्याला । भाऱ्यामंदि घातलं तलवारीला ! । मावळा पुण्यामंदि घेउन गेला । तंवा शिवाजिनं । दहावीस जण । मावळे घेऊन । वेष पालटून । सोडला गड, पुण्यामंदि आला । काळोख काळा कुट्ट भरला । वरात आली होती गणपतीला । गर्दिमंदि शिवराय हो शिरला । ऐकावं र दादा ॥३॥

—: ४ :—

**लाल** महालामधीं येऊन राहिला जरि खान । तरि हालचाल होइना शत्रुपासून । खानाला वाटलं शिवराय गेला घाबरून । बंदोबस्त मोठा पाहून । खानाचं मन । होतं प्रसन्न ॥ चहुकडं सामसूम झाली । माणसं झोंपली । गाढ झोंप आली । खानाला, नव्हतं त्याला देहभान । भररात्रीं खिडकी उघडून । शिवराय आणि चार जण । गेले घुसून ! ॥ खानाचा मुलगा ठार केला । झाला गलबला । खान जागा झाला । पाहतो तों





दिसला काय प्रकार । शिवाजी झाला छातीवर स्वार । तय्यार झाला कराया वार ॥ बायकांनीं दुःखी होऊन । अति गंहिवरुन । हात जोडून । विनवणी केली शिवाजीला । "आमच्या कडं बघुन या वेळेला । जीवदान द्यावं—थोर झाला !" ॥ चाल ॥ शिवराय बोलला खानाला, । "बायकांनीं आक्रोश केला । ह्मणुन देतों जीवदान तुला । पण ऐक माझ्या बोलाला । इथं राहणं योग्य नाहीं तुला । शिवाजीचा मुलख हा झाला । तो घेईल तुझ्या जीवाला । जीवदान देतों आज तुला । जर ऐकशील एका गोष्टीला । माझ्या संगं गोटाबाहेर चला; । आलं पाहिजे तुह्मां सर्वाला" । खानसाहेब घाबरुन गेला ! । हा कोण अदमी घरीं आला । समजेना कांहीं हें त्याला । खानसाहेब चालले शिवाजीच्या संग ते वेळा ! ! ॥ गोटाच्या बाहेर जंवा गेला । तंवा बोलला राजा खानाला ॥ चाल ॥ "धाक ज्याचा बादशाहीला । शिवाजी तोच हा झाला ! ॥ जाऊं नको याच्या वाटेला । वाघनखं लाविलं पोटाला ॥ पण आठवण रहावी रे तुजला । ह्मणून छाटतों तुझ्या बोटाला ! ॥ आजपासून ऐक बोलाला । ह्मण 'शास्ताखान' आपणांला" ॥ असं म्हणून बोट छाटून शिवबा पार झाला ! ! ॥ मग खान गेला माघारा । लाज मोठी वाटली त्याला । तय्यार केलं फौजेला । अन् पाठविली पाठलागाला ॥ इकडं शिवाजीनं काय बेत केला ।

घोक्याचा करणा फुंकला । कात्रजच्या घाटांतिल पोत पेटले ते वेळा ! ॥ शिवाजी गेला त्या स्थळा। असं वाटलं यवनी फौजेला । अन् कात्रजच्या घाटाकडं गेली पाठलागाला ! ! ॥ ततं जाऊन पाहाती त्या वेळा । अन् परतले सारे माघारा ! ! ॥ पर इकडं सिंहगडावरी शिवा पार झाला ॥ चाल ॥ गेला खान फार घाबरुन । पुणं सोडून । तळ हालवून । भवानी साहाय्य शिवाजीला । यश राजाचं वर्णायाला । शाहीर **पांडुरंग** झाला ॥४॥

गोकुळाष्टमी, श. १८५३.